# “ठाणे-पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येच्या वाढ व वितरणाचा भौगोलिक अभ्यास

**प्रामानकरे ज्ञानेश्वर रघुनाथ .**

विभाग प्रमुख, भूगोल विभाग

एस.एन.डी.टी.कला आणि एससी.बी.वाणिज्य व विज्ञान.

महिला महाविद्यालय २०.चर्चगेट,मुंबई ,

**प्रस्तावना:**

आदिवासी हा शब्द Aboriginal या इंग्रजी शब्दावरून आला आहे. “आदिवासी” म्हणजे नागरी संस्कृतीपासून अलिप्त असलेल्या; पण आपल्या स्वत:च्या अशा पारंपारिक वैशिट्यांनी निसर्गाच्या सहवासात फार पूर्वीपासून राहत आलेल्या आणि स्वतंत्र जीवन जगणारा लोकसमूह म्हणजे आदिवासी होय (व्यवहारे २००२). आदिवासी म्हणजे मूळ निवासी, विशिष्ट भौगोलिक प्रदेशात प्राचीन काळापासून राहणारे लोक ( त्या-त्या प्रदेशातील मूळ निवासी ) म्हणजे आदिवासी होय. ( गारे, २००१)

इ.स. १९६२ साली शिलॉंग मध्ये आदिवासी समितीच्या परिषदेने आदिवासी ची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे, “एका समान भाषेचा वापर करणाऱ्या, एकाच पुर्वजापासून उत्पत्ती सांगणाऱ्या , एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव करणाऱ्या , तंत्रज्ञानाच्या दृष्टीने मागासलेल्या , अशिक्षित असलेल्या व रक्तसंबधावर आधारित सामाजिक व राजकीय रितीरिवाजांचे पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला ‘आदिवासी’ समाज म्हणतात.

महाराष्ट्रात एकूण ४७ आदिवसी जमाती आहेत व त्यातील २५ आदिवासी जमातींची लोकसंख्या जास्त आहे. महाराष्ट्रात आदिवासी जमातीच्या लोकसंख्येचे वितरण असमान आहे. महाराष्ट्रातील आदिवासी जमातीची लोकसंख्या ज्या प्रदेशात अधिक आहे त्या प्रदेशाचे भौगोलिक दृष्ट्या तीन विभाग पडतात.

१) **सह्याद्री विभाग** : या विभागात ठाणे,रायगड,नाशिक,अहमदनगर, पुणे इ. आदिवासी बहुल जिल्ह्यांचा समावेश होतो. या विभागात महादेव कोळी, वारली, कोकणा,ठाकर,कातकरी,मल्हार कोळी, इ. जमाती आढळतात.

२) **सातपुडा विभाग** : या विभागात नंदुरबार, जळगाव, अमरावती या जिल्ह्यांचा समावेश होतो. या विभागात भिल्ल, कोकणा,गावित, दुबळा,कोरकू,धानका,ताड्वी, पावरा या जमाती राहतात.

३) **गोंडवाना विभाग** : या विभागात विदर्भातील डोंगराळ व जंगलमय प्रदेशात विशेषतः चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली,यवतमाळ,हिंगोली,नागपूर,वर्धाहे जिल्हे येतात. या जिल्ह्यात गोंड,माडिया गोंड,कोरकू,कोलम,परधान,आंध इ.आदिवासी जमाती वास्तव्य करतात.

महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यात प्रामुख्याने महादेव कोळी,ठाकर,कातकरी,वारली,कोकणा व मल्हार कोळी या जमातींचे लोक वास्तव्य करतात. याशिवाय आंध, बैगा, बारदा, बावचा, भैना, भारिया भूमिया, भात्रा, भिल्ल, भुन्जिया, बिन्झवर, बिर्हूल, चोधरा, धानका, धनवार, धोंडिया, दुबळा, गावित, गोंड, राजगोंड, हलबा, कमार, काठोडी, कवर, खैरवार, खारिया, कोकना, कोल, कोलम, कोळी ढोर , कोळी महादेव, कोळी मल्हार, कोंढ, कोरकू, कोया, नागेसिया, नैकडा, ओराओन, परधान, पारधी, परजा, पाटेलिया, पोम्ला, राठवा, सवर, ठाकूर, वारली, विटोलिया इ. आदिवासी जमातीचे लोक ठाणे – पालघर जिल्ह्यात राहतात.

ठाणे –पालघर जिल्ह्यातील आदिवासी जमातींचे सामाजिक , आर्थिक जीवन, सांस्कृतिक वैशिष्ट्ये, रूढी,परंपरा यांच्यात विविधता आढळते. प्रत्येक जमातींची वेगळी वैशिष्ट्ये आढळतात. प्रत्येक जमातींचे सामाजिक जीवन हे त्यांच्या सभोतालच्या भौगोलिक, आर्थिक आणि परंपरागत चालत आलेल्या व रूढ झालेल्या जीवनदृष्टीने बनलेले आहे. असे असले तरी सर्वसामान्य ‘आदिवासींचे’ जीवन त्यांची मुल्य आणि वैशिष्ट्ये यांच्यात सारखेपणा आढळतो. शेती हा त्यांचा मुख्य व्यवसाय आहे. शेती बरोबरच पशुपालन व दूग्ध व्यवसाय करतात. तसेच लहान- मोठे जंगलावर आधारित व्यवसाय जसे फुले, फळे, मध, डिंक विकणे, बांबू पासून विविध वस्तू बनविणे,शेतमजुरी, नोकरी यावर त्यांचा उदरनिर्वाह चालत असतो.
प्रस्तुत संशोधन लेखातमहाष्ट्रातील ठाणे – पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येची वाढ व आदिवासी लोकसंख्येच्या वितरनाचा अभ्यास केलेला आहे.

**अभ्यास क्षेत्राचे स्थान आणि विस्तार-**


प्रस्तुत संशोधन ठाणे -पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येच्या वाढ व वितरणाचा भौगोलिक अभ्यास करताना अभ्यास क्षेत्र मर्यादित करताना ठाणे जिल्ह्याच्या विभाजन पूर्व क्षेत्राची निवड केली आहे . सद्यस्थितीत अभ्यास क्षेत्रात ठाणे आणि पालघर जिल्हे येतात .अभ्यास क्षेत्राचे अक्षवृत्तीय स्थान १८ ° ४२’ उत्तर ते २०° २०’ उत्तर असून रेखावृत्तीय स्थान ७२° ४५’ पूर्व ते ७३° ४८’ पूर्व आहे .अभ्यास क्षेत्राचे एकूण क्षेत्रफळ ९५५८ चौ.कि.मी .आहे. अभ्यास क्षेत्राची दक्षिणोत्तर लांबी १४० कि.मी .व पूर्व-पश्चिम लांबी १०१ कि.मी. आहे .अभ्यास क्षेत्राचे एकूण क्षेत्रफळ ९५५८ चौ .कि.मी. आहे. अभ्यास क्षेत्रात १५ तालुके येतात . २०११ च्या जनगणनेनुसार अभ्यास क्षेत्रातील लोकसंख्या १ ,१०,६०,१४८ एवढी असून महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येपैकी ९ .८४ %लोकसंख्या आहे .लोकसंख्येची घनता ११०६ इतकी आहे .आदिवासींच्या

लोकसंख्येचा विचार केला तर २०११ च्या जनगणनेनुसार एकूण आदिवासींची लोकसंख्या १५४२४५१ असून एकूण लोकसंख्येपैकी १३.९५ %आदिवासी जमातींची लोकसंख्याआहे.

ठाणे जिल्हा महाराष्ट्राच्या पश्चिमेला उत्तर कोकणातील सर्वात मोठा जिल्हा होता .१ ऑगस्ट २०१४ रोजी ठाणे जिल्ह्याचे विभाजन करून पालघर हा नवीन जिल्हा करण्यात आला. या जिल्ह्यात ७ तालुके आहेत .ठाणे जिल्ह्याचे अक्षवृत्तीय स्थान १८° ४२' उ .ते २०° २०' उ .व रेखावृत्तीय स्थान ७२° ४५' पू .ते ७३° ४८' पू . असून एकूण क्षेत्रफळ ४२१४ चौ .कि.मी .आहे. २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या ८० ,७०,०३२ आहे .तर लोकसंख्या घनता १९०० इतकी आहे.

पालघर जिल्ह्यात ८ तालुके असून पालघर जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ५३४४ चौ .कि.मी .आहे .२०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या ३०,१४,४३४ असून लोकसंख्येची घनता ५६४ एवढी आहे.

**अभ्यास क्षेत्राच्या सीमा –**अभ्यास क्षेत्राचा आकारसाधारणतः त्रिकोणी आकाराचा आहे .याच्या पूर्वेला पुणे आणि अहमदनगर जिल्ह्याच्या सीमा आहेत .पूर्व आणि ईशान्येला नाशिक जिल्ह्याची सीमा आहे .उत्तरेला गुजरात आणि दादरा,नगर,हवेली हा केंद्र शाषित प्रदेश आहे .वाव्येयला अरबी समुद्र असून दक्षिणेला मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यांच्या सीमा आहेत



**ध्येय आणि उद्दिष्टे :**

प्रस्तुत संशोधनाचा मुख्य उद्देश ठाणे-पालघर जिल्ह्यातील आदिवासी जमातीच्या लोकसंख्येचा भौगोलिक अभ्यास करून त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडवण्यासाठीच्या उपाय योजना सुचविणे आहे त्यासाठी खालील उद्दिष्टे ठेवली आहेत.

१) अभ्यास क्षेत्रातील आदिवासी जमातींच्या लोकसंख्येची वाढ व वितरण यांचा अभ्यास करणे.

२) अभ्यास क्षेत्रातील आदिवासी जमातीच्या स्त्री – पुरुष लोकसंख्येचे प्रमाण अभ्यासणे.

३) अभ्यास क्षेत्रातील आदिवासी जमातीच्या लोकसंख्येचे ग्रामीण व नागरी भागातील प्रमाण अभ्यासणे.

**गृहीतके :**

ठाणे-पालघर जिल्ह्यातील आदिवासीं लोसंख्येचा भौगोलिक अभ्यास करताना वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी खालील गृहीतके मांडली आहेत.

१) ठाणे-पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येची वाढ नियमित झालेली आहे.

२) आदिवासी लोकसंख्येची वाढ, वितरण यात प्रादेशिक भिन्नता आदळते .

३) ठाणे – पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्या प्रामुख्याने ग्रामीण भागात जास्त आढळते.

**अभ्यास पद्धती व माहितीचे स्त्रौत :**

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व द्वितीयक स्वरुपाच्या माहितीचे स्त्रौत वापरले आहेत. द्वितीयक माहितीच्या स्त्रौतामध्ये ठाणे जिल्ह्याचे सांख्यिकीय हस्तपुस्तिका, जिल्हा जनगणना अहवाल, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, आदिवासी विकास विभागाचे अहवाल, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे अहवाल,भारतीय जनगणना विभागाचे अहवाल यांचा संशोधनासाठी उपयोग केला आहे.

माहिती व आकडेवारी संकलित केल्यानंतर त्याचे सांख्यिकीय पृथक्करण आणि वर्गीकरण करण्यासाठी तक्ते, आकृत्या, आलेख व नकाशे आवश्यक तेथे काढण्यात आलेली आहेत. सांख्यिकीय विश्लेषण व नकाशाशास्त्रीय तंत्राचा वापरातून निष्कर्ष काढलेली आहेत.

**अभ्यास विषयाचे महत्त्व :**

प्रस्तुत संशोधनामध्ये ठाणे- पालघर जिल्यातील आदिवासी लोकसंख्या, लोकसंख्येची वाढ, वितरण, त्यावर परिणाम करणारे घटकया लोकसंख्याशास्त्रीय घटकाचा अभ्यास केल्यामुळे या संदर्भात निर्माण होणारे प्रश्न सोडवण्यास मदत होईल. तसेच आदिवासींच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी आखलेल्या योजना

प्रभावीपणे राबवण्यासाठी लोकसंख्या वितरणाच्या अभ्यासाची मदत होईल.त्यामुळे आदिवासी जमातीच्या सामाजिक व आर्थिक समस्या सोडवण्यासाठी सहाय्य होईल.

**ठाणे- पालघर जिल्ह्यातील लोकसंख्येची वैशिष्ट्ये-**

ठाणे-पालघर जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या इ.स.२०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात सर्वाधिक १,१०,६०,१४८ इतकी आहे.. यात ५८,६५,०७८ (५३%) पुरुष व ५१,९५,०७०(४७%) इतकी स्त्री लोकसंख्या आहे. लोकसंख्येची घनता १,१५७ चौ.की.मी. इतकी आहे.२००१ ते २०११ या एका दशकातील लोकसंख्येची वाढ ३६.०१ % आहे. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या ९.८४% लोकसंख्या ठाणे जिल्ह्यात आहे. ठाणे जिल्ह्याचे लिंग गुणोत्तर ८८६ आहे. साक्षरतेचे सरासरी प्रमाण ८४.५३ % आहे. बाल वयोगटातील (० – ६ ) लोकसंख्या १३,२७,१४६ असून त्यात मुलांची संख्या ६,८९,६६५ एवढी तर मुलींची संख्या ६,३७,४८१ इतकी होती. जिल्ह्यतील साक्षरतेचे प्रमाण ८४.५३ % इतके आहे.


**ठाणे -पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येची वैशिष्ट्ये**

ठाणे पालघर जिल्ह्यातील आदिवासींची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार १५,४२,४५१ इतकी आहे. यात ७,६९,१९१ पुरुष लोकसंख्या व ७,७३,२६१ स्त्रियांची लोकसंख्या आहे. अभ्यास क्षेत्रातील आदिवासी लोकसंख्येची घनता १६१ प्रती चौ.कि.मी. आहे. २००१ ते २०११ या दशकातील आदिवासी लोकसंख्येची वाढ २७.४३% झालेली आहे. याच दशकात या जिल्ह्यांतील सर्वसाधारण लोकसंख्या वाढ ३६.०१% झालेली आहे याचा अर्थ आदिवासी लोकसंख्येच्या वाढीचा दर कमी आहे.या जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या १३.९४% लोकसंख्या आदिवासी जमातींची आहे. येथील आदिवासी लोकसंख्येचे लिंग गुणोत्तर १,००५ इतके आहे.आदिवासी लोकसंख्येमध्ये शिक्षणाचे एकूण प्रमाण ५८.८७% असून पुरुष साक्षरतेचे प्रमाण ६८.५२% तर स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण ४९.३२% इतके आहे.

**ठाणे –पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येची तालुक्यानुसार वाढ (२००१ ते २०११)**

| अ.क्र. | तालुके | २००१ | २०११ | लोकसंख्येची वाढ (%) |
|---|---|---|---|---|
| ०१ | अंबरनाथ | २६,३४१ | ३६,२२१ | २७.२८ |
| ०२ | भिवंडी | ७३,४१९ | ९२,६६४ | २०.७७ |
| ०३ | डहाणू | २,१५,१६२ | २,७७,९०४ | २२.५८ |
| ०४ | जव्हार | ९९,९३२ | १,२८,४६२ | २२.२१ |
| ०५ | कल्यान | ३४,८९४ | ५४,५१६ | ३५.९९ |
| ०६ | मोखाडा | ६०,९६४ | ७६,८४२ | २०.६६ |
| ०७ | मुरबाड | ३८,५१८ | ४७,३४३ | १८.६४ |
| ०८ | पालघर | १,४०,७३२ | १,६८,१५२ | १६.३१ |
| ०९ | शहापूर | ८९,९९७ | १,१२,१८३ | १९.७८ |
| १० | तलासरी | १,०७,३७९ | १,४०,२७३ | २३.४५ |
| ११ | ठाणा | ४८,७३९ | ७४,९४० | ३४.९६ |
| १२ | वाडा | ७५,१८५ | १,०१,७०९ | २६.०८ |
| १३ | वसई | ८१,२७२ | ९८,२९८ | १७.३२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४ | विक्रमगड | १,०३,२२३ | १,२६,३६८ | १८.३२ |
| १५ | उल्हासनगर | ३,५३३ | ६,५७६ | ४६.२७ |
| | **एकूण** | **११,१९,२९०** | **१५,४२,४५१** | **२७.४३** |





ठाणे-पालघर जिल्ह्यातील २००१ ते २०११ या एका दशकातील आदिवासी लोकसंख्येतील एकूण वाढ २७.४३% आहे. तालुक्यानुसार आदिवासी लोकसंख्येचा आढावा घेतल्यास यात सर्वाधिक लोकसंख्या वाढ उल्हासनगर तालुक्यात ४६.२७% इतकी दिसून येते. परंतु एकूण लोसंख्येचे प्रमाण येथे कमी आढळते २००१ मध्ये उल्हासनगर तालुक्याची लोकसंख्या ३५३३ होती तर २०११ टी ६५७६ इतकी वाढलेली दिसून येते. हा तालुका शहरी भागाचा असल्यामुळे येथे आदिवासी लोकसंख्या कमी आढळते. त्यानंतर सर्वाधिक लोकसंख्या वाढ ३५.९९% इतकी कल्याण तालुक्याची आढळते. त्यानंतर ठाणे तालुक्यातील आदिवासी लोकसंख्या वाढ ३४.९६% इतके असून अंबरनाथ तालुक्याची लोकसंख्या वाढ २७.२८% इतकी आहे. हे तालुके शहरी भागाचे असल्यामुळे येथे झालेल्या आदिवासी लोकांच्या स्थलांतरामुळे वाढ अधिक दिसते. याशिवाय तलासरी २३.४५%,डहाणू २२.५८%, जव्हार २२.२१% या आदिवासीबहुल तालुक्यांची लोकसंख्या वाढ मध्यम प्रमाणात आढळते. सर्वात कमी आदिवासी लोकसंख्या वाढ पालघर तालुक्याची असून ती १६.३१ % इतकी आहे. यानंतर वसई १७.३२%, विक्रमगढ १८.३२, मुरबाड १८.६४ %, मोखाडा २०.६६% आदिवासी लोकसंख्या वाढ आढळते. या आदिवासी लोकसंख्या वाढीवरून ग्रामीण तालुक्यांची कमी व शहरी तालुक्यांची जास्त लोकसंख्या वाढ दिसून येते यावरून ग्रामीण भागातून शहरी भागात स्थलांतर वाढत चाललेले आढळते.

**ठाणे –पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येचे तालुक्यानुसार वितरण (२०११ ) -**

| अ.क्र. | तालुके | एकूण लोकसंख्या | पुरुष लोकसंख्या | स्त्री लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| ०१ | अंबरनाथ | ३६२२१ | १८५०५ | १७७१६ |
| ०२ | भिवंडी | ९२६६४ | ४७६४५ | ४५०२१ |
| ०३ | डहाणू | २७७९०४ | १३५८४२ | १४२०६२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०४ | जव्हार | १२८४६२ | ६३२८० | ६५१८२ |
| ०५ | कल्यान | ५४५१६ | २८१२७ | २६३८९ |
| ०६ | मोखाडा | ७६,८४२ | ३८२४६ | ३८५९६ |
| ०७ | मुरबाड | ४७३४३ | २३६६२ | २३६८१ |
| ०८ | पालघर | १६८१५२ | ८३४२३ | ८४७२८ |
| ०९ | शहापूर | १,१२,१८३ | ५६५९४ | ५५५८९ |
| १० | तलासरी | १,४०,२७३ | ६८६९९ | ७१५७४ |
| ११ | ठाणा | ७४९४० | ३८९२८ | ३६०१२ |
| १२ | वाडा | १,०१,७०९ | ५११६० | ५०५४९ |
| १३ | वसई | ९८२९८ | ४८९२१ | ४९३७७ |
| १४ | विक्रमगड | १,२६,३६८ | ६२६४६ | ६३७२२ |
| १५ | उल्हासनगर | ६,५७६ | ३५१३ | ३०६३ |
| | एकूण | १५४२४५१ | ७६९१९१ | ७७३२६१ |





ठाणे –पालघर जिल्ह्याची २०११ च्या जनगणने नुसार एकूण लोकसंख्या १५४२४५१ इतकी होती. यात ७६९१९१ पुरुष लोकसंख्या तर ७७३२६१ इतकी स्त्रियांची लोकसंख्या होती. स्त्रियांची एकूण लोकसंख्या पुरुषांपेक्षा ४०७० ने अधिक आढळते. याचे कारण पुरुषांचे स्थलांतर आणि आदिवासी जमातीमधील स्त्री प्रधान कुटुंब व्यवस्था होय. तालुक्यानुसार आदिवासी लोकसंख्येचे वितरण पाहिल्यास डहाणू तालुक्याची १६८१५२ इतकी आहे. तलासरीची तालुक्याची आदिवासी लोकसंख्या १४०२७३ आहे. याशिवाय जव्हार तालुक्याची १२८४६२ आदिवासी लोकसंख्या असून विक्रमगडची लोकसंख्या १२६३६८, शहापूर११२१८३, वाडा १०१७०९ सर्वात कमी आदिवासी लोकसंख्या उल्हासनगर तालुक्याची असून ती ६५७६ इतकी आहे. याशिवाय अंबरनाथ ३६२२१, मुरबाड ४७३४३, कल्याण ५४५१६ आदिवासी लोकसंख्येचे वितरण आढळते.

स्त्री- पुरुष लोकसंख्येचे तालुक्यानुसार वितरण पाहिल्यास डहाणू, जव्हार ,वाडा, विक्रमगड, तलासरी, वसई ,पालघर, मोखाडा या तालुक्यामध्ये स्त्रियांची आदिवासी लोकसंख्या पुरुषांपेक्षा अधिक आहे. हे सर्व

आदिवासी बहुल व ग्रामीण भागातील तालुके आहेत.तर शहरी भागातील ठाणे, अंबरनाथ,कल्याण, भिवंडी, उल्हासनगर या तालुक्यामध्ये पुरुषांची लोकसंख्या स्त्रियांच्या लोकसंख्येपेक्षा जास्त आहे.

**ठाणे –पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येचे तालुक्यानुसार ग्रामीण भागातील वितरण (२०११)**

| अ.क्र. | तालुके | एकूण लोकसंख्या | पुरुष लोकसंख्या | स्त्री लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| ०१ | अंबरनाथ | १८८२२ | ९६०२ | ९२२० |
| ०२ | भिवंडी | ७५३३३ | ३८१२१ | ३७२१२ |
| ०३ | डहाणू | २६५७६१ | १२९९३० | १३५८३१ |
| ०४ | जव्हार | १२४२५९ | ६१२११ | ६३०४८ |
| ०५ | कल्यान | १४८६४ | ७६६३ | ७२०१ |
| ०६ | मोखाडा | ७६८४२ | ३८२४६ | ३८५९६ |
| ०७ | मुरबाड | ४६१६६ | २३०४२ | २३१२४ |
| ०८ | पालघर | १४५१३२ | ७१९६० | ७३१७२ |
| ०९ | शहापूर | ९७४९८ | ४९१६२ | ४८३३६ |
| १० | तलासरी | १४०२७३ | ६८६९९ | ७१५७४ |
| ११ | ठाणा | ७३३ | ३७४ | ३५९ |
| १२ | वाडा | ९६५२३ | ४८५५६ | ४७९६७ |
| १३ | वसई | ३९८४७ | १९६८८ | २०१५९ |
| १४ | विक्रमगड | १२३१०९ | ६१०३४ | ६२०७५ |
| | | | | |




ठाणे- पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील आदिवासी लोकसंख्येचे वितरण पाहिल्यास ग्रामीण भागात डहाणू तालुक्यात सर्वात अधिक आदिवासी लोकसंख्या आढळते. त्यानंतर पालघर, तलासरी, विक्रमगड, जव्हार,वाडा,शहापूर अशा क्रमाने आदिवासी लोकसंख्येचे ग्रामीण भागातील वितरण आढळते. डहाणू तालुक्याची लोकसंख्या २६५७६१ इतकी आहे.पालघरची १४५१३२, तलासरीची १४०२७३, जव्हार १२४२५९, विक्रमगड १२३१०९ असे लोकसंख्येचे वितरण आढळते. ग्रामीण भागातील सर्वात कमी


आदिवासी लोकसंख्या ठाणे तालुक्यात असून ती फक्त ७३३ इतकी आहे. याशिवाय कल्याण १४८६४ अंबरनाथ १८८२२, मुरबाड ४६१६६, वसई ३९८४७ असे लोकसंख्येचे वितरण आहे. या तालुक्यांमध्ये ग्रामीण विभाग कमी असल्यामुळे आदिवासींची लोकसंख्या कमी आढळते.

ग्रामीण भागातील आदिवासी लोकसंख्येचे वैशिष्ट्य म्हणजे स्त्रियांची लोकसंख्या पुरुषांपेक्षा अधिक आढळते. कारण ग्रामीण आदिवासी कुटुंब व्यवस्थेत स्त्रियांना मानाचे स्थान आहे, आदिवासी अर्थ व्यवस्थेत देखील स्त्रियांची भूमिका महत्वाची आहे, पुरुषांचे नागरी भागात झालेले स्थलांतर हे ही कारण महत्वाचे आहे.

**ठाणे –पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येचे तालुक्यानुसार नागरी भागातील वितरण(२०११)**

| अ.क्र. | तालुके | एकूण लोकसंख्या | पुरुष लोकसंख्या | स्त्री लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| ०१ | अंबरनाथ | ९०१ | ४६० | ४४१ |
| ०२ | भिवंडी | ९१५३ | ४८१२ | ४३४१ |
| ०३ | डहाणू | २८२० | १३५९ | १४६१ |
| ०४ | जव्हार | ० | ० | ० |
| ०५ | कल्यान | २७८८ | १४२० | १३६८ |
| ०६ | मोखाडा | ० | ० | ० |
| ०७ | मुरबाड | ११७७ | ६२० | ५५७ |
| ०८ | पालघर | १३३०० | ६७१४ | ६५८६ |
| ०९ | शहापूर | १४६८५ | ७४३२ | ७२५३ |
| १० | तलासरी | ० | ० | ० |
| ११ | ठाणा | ० | ० | ० |
| १२ | वाडा | ५१८६ | २६०४ | २५८२ |
| १३ | वसई | ९६१ | ४५२ | ५०९ |
| १४ | विक्रमगड | ३२५९ | १६१२ | १६४७ |
| | | | | |

ठाणे –पालघर जिल्ह्यातील नागरी भागातील आदिवासी लोकसंख्येचे वितरण पाहिल्यास नागरी भागात खूप कमी आदिवासी लोकसंख्या आढळते. ठाणे – पालघर जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात नागरीकरण झालेले आहे. त्यामुळे आदिवासी लोकसंख्येवर याचा परिणाम होत आहे. शहरी भागात सर्वात अधिक आदिवासी लोकसंख्या शहापूर तालुक्यात असून ती १४६८५ आहे त्यात स्त्रियांची लोकसंख्या ७४३२ असून ७२५३ इतकी स्त्री लोकसंख्या आढळते. यानंतर पालघर तालुक्यात १३३०० लोकसंख्या नगरात राहते त्यात ६७१४ पुरुष व ६५८६ इतकी स्त्रियांची लोकसंख्या आढळते. याशिवाय भिवंडी ९१५३, विक्रमगड ३२५९, वाडा ५१८६, डहाणू २८२० आणि कल्याण २७८८ इतकी लोकसंख्या आढळते. नागरी भागातील आदिवासी लोकसंख्या जव्हार, तलासरी,मोखाडा येथे आढळतच नाही कारण या भागात एकही मोठे नगर नाही.म्हणून या तालुक्यात अआदिवासी लोकसंख्या दाखवलेली नाही. सर्व नगरातील स्त्री पुरुष लोकसंख्येचे निरीक्षण केल्यास शहरातील स्त्रियांची लोकसंख्या कमी आढळते. कारण शहरामध्ये आदिवासी पुरुषाचेच कामासाठी स्थलांतर झालेले आहे.




**निष्कर्ष-**

ठाणे-पालघर जिल्ह्यांतील आदिवासी लोकसंख्येच्या वाढ व वितरणाचा अभ्यास केल्यानंतर खालील निष्कर्ष निघतात-

१) ठाणे – पालघर जिल्ह्यातील सर्वसाधारण लोकसंख्येची वाढ वेगाने होत आहे.

२) ठाणे- पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्या वाढ एकूण लोकसंख्या वाढीपेक्षा कमी पण सातत्त्याने होत आहे.

३) ठाणे –पालघर जिल्ह्यतील आदिवासी लोकसंख्यावाढ ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात जास्त आहे.

४) ठाणे –पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येचे वितरण ग्रामीण भागात अधिक आहे.

५) ठाणे –पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येत स्त्रियांची लोकसंख्या पुरुष लोकसंख्येपेक्षा अधिक आहे.

**संदर्भसूची :**

१) अहिरराव व अलीझाड (२००१) : " लोकसंख्या भूगोल ", निराळी प्रकाशन, पुणे.

२) गारे गोविंद (२०००) : " महाष्ट्रातील आदिवासी जमाती", कौंटीनेन्टल प्रकाशन,पुणे.

३) गारे गोविंद (२००२) : "सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील (ठाकर) आदिवासी", श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

४) कुलकर्णी शौनक (२००९) : "महाराष्ट्रातील आदिवासी", डायमंड प्रकाशन, पुणे.

५)Thane District Gazetteer

६) Thane district Statistical Handbook 2012

७ )District Census Handbook Thane 2011 -Series 28 Part xii B